**प्रेसनोट दि:- ०३/०५/२०१९.**

**विश्रामबाग पोलीस स्टेशन,पुणे शहर.**

**पुण्यातील जेष्ठ नागरिकास पोलीसांच्या कर्तव्य तत्परते बाबत आलेला चांगला अनुभव.**

दिनांक २६/०४/२०१९ रोजी पुणे शनिवार पेठेतील जेष्ठ नागरिक श्री विश्वास यशवंत गोडबोले यांनी विश्रामबाग पोलीस स्टेशनकडील पोलीसांच्या कर्तव्य तत्परते बाबत आलेल्या चांगल्या अनुभवाबद्दल मा.पोलीस आयुक्त सो, यांना लेखी पत्र पाठवून धन्यवाद दिलेले आहेत. याबाबतची हकिगत अशी आहे की श्री विश्वास यशवंत गोडबोले, वय ८७ वर्षे, रा. ३७९ शनिवार पेठ, पुणे हे विमा कॉमर्स हाऊस या संस्थेचे संचालक असुन दिनांक २६/०४/२०१९ रोजी सकाळ पासुन त्यांचे ग्रंथालय असलेल्या जागेत कोणीतरी दुचाकी उभी करुन ठेवलेली होती ज्यामुळे श्री गोडबोले यांना त्यांचे ग्रंथालयात प्रवेश करणे अशक्य झाले होते. सदर वेळी श्री गोडबोले यांनी शनिवार पेठ पोलीस चौकी मध्ये जावून दिलेल्या तोंडी तक्रारीचे अनुषंगाने तेथील चौकी अंमलदार पोलीस हवालदार अनिल रामदास शेलार तसेच महिला पोलीस शिपाई सुनिता बबन फंड व मपोशि सारीका धिरज खोचरे अशांनी संबंधीत जागेवर तात्काळ भेट घेवून गाडी मालकाचा शोध घेवून श्री गोडबोले यांचे जागेत उभी असलेली दुचाकी बाजुला काढुन दुचाकी मालकाला पुन्हा असे कृत्य न करणेबाबत तोंडी समज दिली. एका जेष्ठ नागरिकाच्या तोंडी तक्रारीवरुन पोलीसांनी तात्काळ दखल घेवून तातडीने वरीलप्रमाणे कारवाई केल्याबद्दल श्री विश्वास यशवंत गोडबोले यांनी लेखी पत्राव्दारे त्यांना पोलीसांबद्दल आलेल्या चांगल्या अनुभवाबाबत कौतुक करुन धन्यवाद दिलेले आहेत.

( एस.पी.कलगुटकर )
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
विश्रामबाग पोलीस ठाणे,पुणेशहर.